दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५

# झोनल, इंटर झोनल स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेज उपविजेता

## • शिक्षण क्षेत्रातून कौतुक



कोल्हापूर : मैदानी स्पर्धेमध्ये कोल्हापूर झोन व इंटरझोन उपविजेतेपद चॅम्पियनशिप मिळवलेला विवेकानंदचा संघ.

**जनप्रवास : कोल्हापूर**

झोनल व इंटरझोनल मैदानी स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या महिला संघाने विविध खेळ प्रकारांमध्ये यश मिळवून कोल्हापूर झोन व इंटरझोन उपविजेतेपद चॅम्पियनशिप मिळवली. याबद्दल त्यांचे शिक्षण क्षेत्रातून कौतुक होत आहे.

झोनल व इंटरझोनल मैदानी स्पर्धांच्या संघामध्ये रिया पाटील, झोनल मैदानी स्पर्धेमध्ये ४०० मीटर धावणे गोल्ड मेडल तर इंटरझोनल ४०० मीटर धावणे स्पर्धेमध्ये ५६.७५ इतक्या वेळेमध्ये स्पर्धा पूर्ण करून सुवर्णपदक मिळवले. त्याचबरोबर मैदानी महिला गटामध्ये वैयक्तिक चॅम्पियनशिप मिळवून ती सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली. तितिक्षा पाटोळे हिने झोन १०० मीटर धावणे गोल्ड मेडल, २०० मीटर धावणे गोल्ड मेडल, इंटरझोनल १०० मीटर धावणे गोल्ड मेडल तर २०० मीटर धावणे ब्राँझ मेडल मिळविले. तन्वी जमसांडेकरने झोन २०० मीटर सिल्वर, तिहेरी उडी ब्राँझ मेडल, तर इंटरझोनल स्पर्धेमध्ये तिहेरी उडी सिल्वर मेडल प्राप्त केले. रितिका मगदूमने झोनल स्पर्धेमध्ये लांब उडी गोल्ड मेडल, १०० मीटर ब्राँझ मेडल, तर इंटरझोनल स्पर्धेमध्ये लांब उडी गोल्ड मेडलइंटरझोनल स्पर्धेमध्ये लांब उडी गोल्ड मेडल मिळविले.

गौरी भारतीने झोन व इंटरझोन थाळीफेक क्रीडाप्रकारात सिल्वर मेडल मिळविले. सानिका बोडकेने १०० मीटर हर्डल्स ब्राँझ मेडल. प्राप्त केले. श्रावणी जाधवचा रिले संघात समावेश. तसेच या संघाने झोनल स्पर्धेत ४ × १०० मीटर रिले गोल्ड मेडल तर ४ ४ ४०० मीटर रिले गोल्ड मेडल मिळवले. तसेच इंटरझोनल स्पर्धेत ४ × १०० मीटर रिले गोल्ड मेडल प्राप्त केले. सर्व यशस्वी खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी
मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५

# मैदानी स्पर्धेत 'विवेकानंद'चा महिला संघ उपविजेता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या झोनल व इंटरझोनल मैदानी स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या महिला संघाने उपविजेतेपद पटकावले. विविध क्रीडा प्रकारांमधील उल्लेखनीय यशामुळे या संघाचे कौतुक होत आहे.

या संघातील रिया पाटील (एम.एस्सी. सीएस १) हिने झोनल स्पर्धेतील ४०० मीटर धावण्यात सुवर्णपदक मिळवले. इंटरझोनल स्पर्धेतही ४०० मीटर धावणे केवळ ५६.७५ सेकंदांत पूर्ण करत सुवर्णपदकासह वैयक्तिक चॅम्पियनशिप पटकावून सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली. तितिक्षा पाटोळे (बी.ए. २) हिने झोनल १०० मीटर व २०० मीटर धावण्यात प्रत्येकी सुवर्णपदक मिळवले. इंटरझोनलमध्ये १०० मीटर सुवर्ण, तर २०० मीटर धावण्यात कास्यपदक मिळवले. तन्वी जमसांडेकर (बी.बी.ए. ३) हिने झोनल २०० मीटर रौप्य, तिहेरी उडीत कास्य, तर इंटरझोनल तिहेरी उडीमध्ये रौप्यपदक पटकावले. रितिका मगदूम (एम.ए. २) हिने झोनल लांब उडीत सुवर्ण, १०० मीटरमध्ये कास्य, तसेच इंटरझोनल लांब उडीत सुवर्णपदक मिळवले. गौरी भारती (बी.एस्सी. ३) हिने झोन व इंटरझोन दोन्ही स्पर्धांमध्ये थाळीफेक प्रकारात रौप्यपदके जिंकली. सानिका बोडके (बी.एस्सी. १) हिने १०० मीटर हर्डल्समध्ये कास्यपदक मिळवले. श्रावणी जाधव (बी.कॉम. १) हिचा रिले संघात सहभाग होता.

महिला संघाने झोनल ४ बाय १०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले धावण्यात सुवर्णपदके मिळवली. इंटरझोनल स्पर्धेतही ४ बाय १०० मीटर रिले संघाने सुवर्णपदक पटकावले. या यशस्वी खेळाडूंना विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन मिळाले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के. धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.